# पुणे विद्यापीठ
## राष्ट्रीय सेवा योजना

**डॉ. पंडीत एन्. शेळके**
एम्.एस्सी.,पीएच् डी.
**प्र. कार्यक्रम समन्वयक**

**गणेशखिंड, पुणे - ४११ ००७.**

कार्यालय क्र. : ०२०-२५६९७३४१
०२०-२५६०११५३
०२०-२५६०११६०
फॅक्स क्र. : ०२०-२५६९७३४१

रासेयो/८८५ /२०१३

दि. १९/०९/२०१३

प्रति
मा.प्राचार्य / कार्यक्रम अधिकारी,
रासेयो संलग्नित सर्व महाविद्यालये
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा

**विषय :— रासेयो सप्ताह साजरा करणेबाबत...**

महोदय,

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांच्यात सर्वांगिण व्यक्तीमत्व विकास घडवून आणणे या उद्देशाने स्वावलंबन, चारित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय नवीन शिक्षणपद्धतीत घडवून आणण्यासाठी महात्मा गांधी जन्मशताब्दी वर्षापासून २४ सप्टेंबर १९६९ साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी तत्कालीन शिक्षणमंत्री यांनी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्याची घोषणा केली.

त्यानुसार प्रत्येक वर्षी दि. २४ सप्टेंबर हा दिन 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' म्हणून महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात येतो. यावर्षी रासेयो दिनानिमित्त 'रासेयो सप्ताह' दि. २४ ते ३० सप्टेंबर २०१३ दरम्यान महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात येणार असून रासेयो दिनामिमित्त वरील सप्ताहात खालील विषयांवर आधारीत विविध कार्यक्रमांचे व चर्चासत्रांचे आयोजन आपण आपल्या महाविद्यालयांमध्ये करावे.

— महिलांवर होणारे अत्याचार —उपाययोजना व जनजागृती
— राष्ट्रीय सेवा योजना व गांधी विचारधारा
— राष्ट्रीय एकात्मता आणि राष्ट्रीय सेवा योजना
— राष्ट्रीय सेवा योजनेत प्रसारमाध्यमांची भूमिका
— आजच्या युवकांची व्यसनाधिनता — महाविद्यालयीन आरोग्यजागर
— यशवंतराव चव्हाण यांच्या विचारावर आधारीत विषयांवर स्पर्धेचे आयोजन
— पर्यावरणीय असमतोल— आजची समस्या
— स्त्री.भ्रुणहत्या — मुलींचा घटता जन्मदर

तरी वरील विषयांवर आधारीत कार्यशाळा, पोस्टर, वत्कृत्व स्पर्धा, प्रदर्शन, चर्चासत्र, इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करून कार्यशाळेचा अहवाल रासेयो कार्यालयास सादर करावा ही विनंती. सदर कार्यशाळेचा खर्च रासेयो नियमित कार्यक्रमांमधुन करावयाचा आहे.

**आपला विश्वासू,**

१९/९/१३

**प्र. कार्यक्रम समन्वयक**
**राष्ट्रीय सेवा योजना**

**Website :** http://www.unipune.ac.in/nss **e-mail :** nss@unipune.ac.in